# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थपित राज्य विद्यापीठ)

*(आस्थापना विभाग)*

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२१६५९२

**क्र. गो.वि/आस्था/385 /२०१७** **दि. : 8 /०२/२०१७**

## परिपत्रक

**विषय** :– कार्यालयामधील अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीचे सक्षमीकरण करणेबाबत.

**संदर्भ** :– १. महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचे पत्र क्रं. ममआ/२०१७/मतनिस/का–३/३७, दि. ०९/०१/२०१७.
२.महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचे पत्र ममआ/२०१७/कवद्यापीठ/का–३/१४८, दि. २४/०१/२०१७.

गोंडवाना विद्यापीठातील संलग्नीत सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय शासन परिपत्रकानुसार कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध मनाई आणि निवारण) अधिनियम–२०१३ या कायद्याच्या अमलबजावणीसाठी प्रत्येक कार्यालयात महिलांच्या तक्रार निवरणासाठी "अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती" स्थापन करणे अनिवार्य आहे. सदर कायद्याच्या अमलबजावणीसाठी तसेच कायद्याबद्दल जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने राज्य महिला आयोग व गोंडवाना विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार **दि. १० फेब्रुवारी २०१७** ला या विषयीची कार्यशाळा **"सरदार पटेल महाविद्यालय,गंज वार्ड, चंद्रपूर"** येथे **सकाळी ९.०० वाजता** घेण्याचे ठरविले आहे. सदर कार्यशाळा TOT(Training of Trainers) स्वरुपाची राहील. या कार्यशाळेकरिता आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य व अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीचे दोन प्रतिनिधींना महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या निर्देशानुसार उपस्थित राहणे अनिवार्य आहे. सोबत येतांना आपल्या महाविद्यालयात कार्यरत असलेल्या अंतर्गत तक्रार निवारण समितीची प्रत संपूर्ण माहितीसह आणने बंधनकारक राहील.

यासंदर्भात आसावरी शै. सोज्वळ, प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांनी संदर्भिय पत्र क्रमांक ०२ अन्वये उपरोक्त बाबत आपल्या महाविद्यालयाद्वारे आयोजित करण्यात येणा–या कार्यशाळेच्या आयोजन/नियोजनात काही अडचणी उद्भवल्यास आयोग कार्यालयाच्या ०२२–२६५९१३२२ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच आपल्या महाविद्यालयात कार्यशाळा आयोलित करुन त्याबाबतचा अहवाल ०१ मार्च २०१७ पर्यंत महाराष्ट्र राज्यमहिला आयोग ,गृहनिर्माण भवन,कला नगर,पोटमाळा,वांद्रे(पूर्व),मुबई–४०००५१ या कार्यालयाकडे पाठवावे तसेच अहवालाची एक प्रत विद्यापीठास सादर करावे.

सदर आयोजित कार्यशाळेला उपस्थित राहणे अनिवार्य आहे. कार्यशाळेच्या उपस्थितीतीबाबत प्रवासभत्ता व दैनिक भत्ता देय राहणार नाही. नोंद घ्यावी.

**सहपत्र संलग्नः–**
१.उपरोक्त संदर्भिय पत्र.

(दिपक एस. जुनघरे)
कुलसचिव(का)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली द्वारा आयोजित**

## एक दिवशीय कार्यशाळा

**विषय**

**"कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासुन संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ ची अमलबजावणी"**

**दिनांक १० फेब्रुवारी २०१७** **स्थळ: सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर**

---

—: कार्यक्रम पत्रिका :—

**उद्‌घाटन व स्वागत समारंभ**

| | |
|---|---|
| ९:३० | नोदणी व अल्पोपहार |
| १०:३० | मान्यवरांचे सभागृहात आगमन |
| १०.३५ | विद्यापीठ गीत |
| १०.४० | दीप प्रज्वलन |

**पाहुण्याचे स्वागत**

**अध्यक्ष :** **मा. डॉ. एन.व्ही. कल्याणकर**
कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रमुख अतिथी :** **श्रीमती. विजया रहाटकर,**
अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

**मा. डॉ. मंजुषा मोळवणे**
उपसचिव महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

**मा. विशाल केडीया,** प्रमुख वक्ता

**मा. डॉ. राजेश इंगोले**
प्राचार्य, सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर

**प्रास्ताविक :** **डॉ. अंजली हस्तक**
प्रमुख अतिथींचे मार्गदर्शन
अध्यक्षीय भाषण
आभार

**सत्र पहिले : प्रशिक्षण शिबीर ११:३० ते ०१: ३०**

मार्गदर्शक: विशाल केडीया

भोजन अवकाश: १:३० ते २: ३०

**सत्र दुसरे: प्रशिक्षण शिबीर ०२:३० ते ०४:००**

मार्गदर्शक: विशाल केडीया

आभार : डॉ, प्रिया गेडाम

राष्ट्रगीत

**प्रमाणपत्र वितरण ४.१५ ते ५.००**

(दिपक एस. जुनघरे)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली